दि. १८।३।८८
सकाळी १०वा.
मुंबई-

18/3/88

भारतीय रिपब्लिकन पक्षाचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी दि. १७ मार्च-८८ रोजी सायं. ६ वा. आंबेडकर भवन, नायगांव, मुंबई येथे आंबेडकरी चळवळ व समता चळवळींचे ऐक्याबाबत बैठक बोलाविली होती. सायं.७ ते रात्री १२.४५ वा. पर्यंत बैठक चालली. व खालील निर्णय घेऊन संपली.

* प्रथम अध्यक्षस्थानी प्रकाश आंबेडकर होते. ते कामानिमित्त बाहेरगांवी गेल्यानंतर उरलेल्या वेळात प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी अध्यक्षस्थान स्विकारले.

* उपस्थित पक्ष/संघटना व प्रतिनिधी

१. भारतीय रिपब्लिकन पक्ष : प्रकाश आंबेडकर, अविनाश महातेकर
२. दलित मुक्ती सेना : जोगेंद्र कवाडे,
३. भारतीय दलित पँथर : रामदास आठवले/ अरुण कांबळे,
४. अखील भारतीय मातंग संघ : विठ्ठल साठे,
५. भटक्या-विमुक्त जमाती संघटना : बाळकृष्ण रेणके,
६. भटके-विमुक्त युथ फ्रंट : मोतीराज राठोड,
७. महाराष्ट्र मातंग संघटना : रघुनाथ आडागळे,
८. महात्मा फुले जाती-जमाती संघ : अप्पा मोहिते,
९. दलित स्वयंसेवक संघ : मोहन वाघमारे,
१०. ओ.बी.सी. संघटना : जनार्दन पाटील,
११. छात्र युवा संघर्ष वाहिनी : भाग्यवान शिंदे,
१२. युवक क्रांती दल : शांताराम पंदेरे,
१३. मास मुव्हमेंट : राजा ढाले, ज.वि. पवार,

या बैठकीसाठी आमंत्रित परंतु न आलेल्या संघटना व प्रतिनिधी.

१. रिप.पार्टी ऑफ इंडिया : रा.सु. गवई,
२. " " : वा.को. गाणार,
३. " " : बी.सी. कांबळे,
४. भूमिसेना : काळुराम दोधडे-

व इतर काही

'डॉ. आंबेडकर विचार संवर्धन समिती' (रिडल्स प्रकरण) मधील दलित पँथरचे

नामदेव ढसाळ, प्रॅक्टिकल सोशालिझम् चे भाई संगारे व बंडखोर रिपब्लिकनचे खंबाळकर यांनाच फक्त निमंत्रित केले नव्हते.

प्रास्ताविक : प्रकाश आंबेडकर :

'रिडल्स' प्रकरणी ५ फेब्रु. ८८ रोजी मुंबईत निघालेला दलितांचा मोर्चा हा खूप मोठा होता. प्रश्न सोडविला. परंतु ती भावनिक प्रश्नावर उभी राहिलेली शक्ती होती. राजकीय शक्ती म्हणून ती बांधलेली नव्हती. परंतु दलितांमधील विविध रिपब्लिकन गट व संघटनांचे पुढारी एकत्र आलेले पाहून 'ऐक्य' भावना अधिक बळावली.

परंतु हे 'गट व संघटना' प्रत्यक्षात फक्त एकजातीय व एकसूरी (महार व आंबेडकर मानणारे). या पलिकडचे गट-संघटना-चळवळी आहेत. या सर्व ~~एकवटल्या व~~ समान प्रश्नांवर (Issues) एकवटल्या तर त्यातून राजकीय शक्ती व परिणाम होईल. ~~म्हणू~~ ही एक दीर्घ पल्ल्याची गंभिरपणे घडविणारी प्रक्रिया आहे. तिला खिळ घालणारे, वातावरण नेहमीच बिघडवणारे, ज्यांचे राजकीय हेतूच शुद्ध नाहीत अशांना बोलाविलेले नाही. (उदा. वरील तीन गट). म्हणून हे निमंत्रण भा.रिप. पक्षाच्या लेटरपॅडवर पाठविले. 'आंबेडकर विचार संवर्धन समिती' च्या वतीने नाही.

या बैठकीत व्यक्त झालेली प्रमुख मते :

* आंबेडकर विचार संवर्धन समितीतील सर्वांना बोलवावे. सर्वानुमते एक आचार संहिता बनवावी. म्हणजे जाहिर वाद होणार नाहीत.
* ऐक्यविषयक राजकीय तत्त्वज्ञान असावे- सध्या एक समन्वय समिती करावी.
* दलित व्याख्या व्यापक — दलित जाती (अस्पृश्य जाती), आदिवासी, भटके-विमुक्त, इतर मागास घटक हीच खरी शक्ती, (भूमिहीन इ.)
* एक जातीय व एक प्रवाही चळवळीचे केंद्र दुसरीकडे गेल्याशिवाय पर्याय नाही. अधिक शोषित घटकांचे केंद्र व आंबेडकरांच्या पलिकडे गेले पाहिजे. गवईसारखे Reactionary या प्रक्रियेत अजिबात नकोत. संघटीत राजकीय पक्षच उभा करायचा आहे. फक्त आंबेडकर पुण्याई घेऊन आपण काहीही करू शकणार नाही.
* सर्व वादांची ('Ism') चिकित्सा झाली पाहिजे. भावनिकता नको.
* भावनिक वातावरणातील 'ऐक्य परिषदां'तून ही ऐक्य प्रक्रिया-

गतिमान होऊच शकणार नाही. ती अदीर्घ काळ, गांभिर्यपणे चालणारी प्रक्रिया आहे. ती नेतृत्व, कार्यकर्ते व जनसमूहांच्या विविध पातळ्यांवर वेगवेगळ्या वेळी गतिमान करावी लागेल.

* एकत्र येण्याची घाई न करता किमान ५ वर्षांचा कार्यक्रम व त्यावर एकत्र येण्यासाठी व्यापक मंच करावा.
* नेत्यांऐवजी चळवळींचे ऐक्य - सामाजिक आघाड्या राजकीय पक्षांपासून अलग ठेवाव्यात.
* मंडल आयोग, राखीव जागा व इतर आर्थिक प्रश्नावर एकत्र यायला हवे.
* ही बैठक ऐतिहासिक. सर्व दलित नेते एकत्र येतील हा भ्रम नको. संघटनांची नावे-चूल बंद करायला तयार आहेत.
* १९४७ ते ६७ हा स्वातंत्र्य लढ्यात भारलेला कॉंग्रेसचा काळ

१९६७ ते १९७७ : 'संविद' च्या प्रयोगातून व त्यावेळच्या राजकीय-आर्थिक परिस्थितीतून निर्माण झालेले बिगरसंसदीय पण राजकीय गट-संघटना.

उदा. मार्क्सवादी-लेनिनवादी गट, युक्रांद, वाहिनी, मागोवा, इ.

१९७७ नंतर : ऐक्य, व्यापक एकजूट, नवीन राजकीय पक्षांचा शोध, प्रादेशिक पक्षांचा मोठ्या प्रमाणावर उदय व आंदोलनांचा काळ.

: मार्क्सवादी गटांत ऐक्य प्रक्रिया
: मार्क्स-लेनिनवादी " "
: समाजवादी गटांत " "
: बिगरसंसदीय गटांत " "
: महिला चळवळीत " "
: दलित / आदिवासी / भटके-विमुक्त / कामगार / शेतमजूर / शेतकरी समूहांत ऐक्य प्रक्रिया.
: विज्ञान / साहित्य / पातळीवर ऐक्य प्रक्रिया-
इ. इ. इ.

<u>ऐक्य प्रक्रियेतील टप्पे</u> :
⊙ तत्त्वज्ञानाच्या पातळीवर-सैद्धांतिक पातळीवर संवाद-चर्चा
⊙ समान व किमान कार्यक्रमांवर आघाड्या व ते प्रश्न तडीस नेणे;
⊙ नव्या क्रांतिकारक स्वरूपाच्या (राजकीय पक्षाचा) शोध - निर्मिती प्रक्रिया-

* कोणत्याही सध्याच्या पक्षात विलिनीकरण नको.

* सर्व मार्क्सवादी, समाजवादी पक्ष ब्राह्मणी नेतृत्वापासून व वर्चस्वापासून मुक्त होऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक चारित्र्य दलित, आदिवासी, भटके-विमुक्त व इतर मागास घटकांना सामावून घेऊ शकले नाहीत.

* लोहियांसह सर्वांच्या पुढे गेले पाहिजे.

* काँग्रेसच्या विरोधात militant Front असावी. पक्षसंघटनांना बोलवावे. व्यक्तींना मागावून घ्यावे. शक्तीच्या विचार या चर्चेत नको. प्रत्यक्ष संघटनात्मक ढाचा ठरविताना याचा विचार व्हावा.
दुसऱ्या पक्षातील दलितांना दबाव टाकून या व्यापक प्रवाहात बोलवावे. (काँग्रेस सह पक्ष)

* सध्या चालू असलेल्या जमीन, गावठाण, किमान वेतन, भटके-विमुक्त आदिंच्या चळवळींना सक्रिय पाठिंबा द्यावा. १९८८-८९ साली राखीव जागांच्या विरोधात आगडोंब उठणार आहे. त्याविरोधात 'एकशक्ती' दाखविण्याची गरज.

ऐक्य प्रक्रियेतून वैचारिक व सर्वमत घुसळण चालू ठेवावी. चाललेले वैचारिक मंथन सतत लोकांसमोर आपणच आणावे. यावर एकवादी परिषद घ्यावी.

यानंतरच राजकीय पक्षाच्या विचार व्हावा.

निर्णय:-

१. रिप. पक्षातील विविध गट, दलितांमधील विविध चळवळी (उदा. अस्पृश्य जाती, आदिवासी, भटके-विमुक्त, इतर मागास घटकांच्या चळवळी, संघटना इ.) यांचे ऐक्य व्हावे याविषयी या बैठकीत एकमत झाले.

२. ~~आंबेडकर विचार संच~~ दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, भूमिहीन व इतर मागास घटकांच्या सध्या चाललेल्या आंदोलनांना ही बैठक पाठिंबा देत आहे. व सर्वजण त्यात सक्रीय सहभाग घ्यावा. (उदा. २६ मार्च भूमिहीनांचा धडक मोर्चा; २५ एप्रिल भटक्या-विमुक्तांचा 'पाल' मोर्चा, दलित-आदिवासी-भ.वि. विद्यार्थी शिष्यवृत्तीवाढ लढा; किमान वेतन, गावठाण यावरील शेतमजूर, आदिवासींचे लढे इ.)

३. सरताळे जि. सातारा येथील मातंगावरील अत्याचाराचा निषेध.

४. आंबेडकर विचार सं. समितीतील सर्व घटक, या बैठकीतील उपस्थित व न आलेले पक्षसंघटनांच्या प्रतिनिधींची बैठक ८ एप्रिल ८८ रोजी [illegible] लोणावळा येथे होईल व याविषयी प्रत्येकाने आपली भूमिका मांडावी.